# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,

## मुंबई विभागीय मंडळ,वाशी,नवी मुंबई-४०० ७०३.

M. S. Board Of Secondary And Higher Secondary Education,

Mumbai Divisional Board, Vashi, Navi Mumbai-400 703.


---

क्र.मुविमं/माध्य.परीक्षा / ३२९३
वाशी, नवी मुंबई - ४००७०३
दिनांक:- २९ / ११ /२०२२

प्रति,
मुख्याध्यापक/ प्राचार्य
मुंबई विभागीय मंडळाच्या
कार्यकक्षेतील सर्व मान्यता
प्राप्त शाळा/ क.महाविद्यालय

**विषय :- माध्यमिक शालांत प्रमाणतत्र (इ. १०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) परीक्षा दिव्यांग विद्यार्थ्यांच्या सवलतीबाबत...**
**संदर्भ:- क्र.रा. मं /परीक्षा-५/६२१८ दि.१०/११/२०२२ रोजीचे राज्य मंडळाचे पत्र.**

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरून मुंबई विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व मान्यता प्राप्त शाळा / क. महाविद्यालय यांना कळविण्यात येते की, शासन निर्णय संकिर्ण १०१७ (११८/१७) एम. डी ६/ दिनांक १६/१०/२०१८ नुसार शासन निर्णयात नमूद केलेल्या २१ आजार असलेल्या दिव्यांग विद्यार्थ्यांना देय असणा-या सवलती देण्यात येतात. मात्र सदर २१ आजारापैकी खाली नमूद केलेल्या ०५ आजार असलेल्या विद्यार्थ्यांकरीता मंडळामध्ये विहित नमूना फॉर्म उपलब्ध आहेत.

१) अंध विद्यार्थी (Blind)
२) कर्णबधिर (Deaf)
३) मूकबधिर (Dumb)
४) अस्थिव्यंग (Handincapped)/ बहुविकलांग (Spastic)
५) अध्ययन अक्षमता (Leaning Disability)

उपरोक्त ०५ आजार वगळता अन्य १६ आजार असलेल्या विद्यार्थ्यांकरीता विहित नमूना फॉर्म उपलब्ध नसल्याने सदर दिव्यांग विद्यार्थी जिल्हा चिकित्सक, जिल्हा सामान्य रुग्णालय यांचे कडे(सोयी/ सवलती मिळणेबाबत) स्वाक्षरी शिक्का घेणे करीता गेल्यास स्वाक्षरी, शिक्का मिळण्यास अडचणी येत असल्याने निदर्शनास येत आहे. त्यामुळे सदर शासन निर्णयातील संस्थानी दिव्यांग विद्यार्थ्यांना दिव्यांगत्वाचे कायम स्वरूपाचे किंवा काही आजारात भविष्यात बदल होणार असेल तर विहित मुदतीचे प्रमाणपत्र संबधित मुख्याध्यापक/ प्राचार्य यांनी प्रमाणित करावे. त्याची सत्यप्रत, शाळा/ क. महाविद्यालय प्रमुखांचे शिफारस पत्र व अन्य आवश्यक कागदपत्रासह प्रस्ताव दिव्यांग विद्यार्थ्यांकडून स्विकारावा व शासन निर्णयानुसार देय असणाऱ्या सवलती दिव्यांग विद्यार्थ्यांना देण्याबाबतचा प्रस्ताव मंडळाकडे सादर करावा. सदरची कार्यवाही मार्च २०२३ च्या मा.शा.प्र (इ. १० वी) व उच्च माध्य.प्रमाणपत्र (इ. १२ वी) परीक्षेपासुन करण्यात यावी. केवळ विहित नमुना फॉर्म नाही म्हणुन दिव्यांग विद्यार्थी सवलतीपासून वंचित राहणार नाही यांची दक्षता सर्व शाळा व क. महाविद्यालयांनी घ्यावी.

विभागीय सचिव
(डॉ.सुभाष बोरसे)
मुंबई विभागीय मंडळ
वाशी, नवी मुंबई. ४००७०३

प्रत माहितीस्वत:- १. शिक्षण विभाग (माध्यमिक) जिल्हा परिषद पालघर.
२. प्रत उच्च माध्य.परीक्षा शाखा

Scanned by TapScanner